# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय ,सिंधुदुर्ग,

**सामान्य शाखा, (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सिंधुदुर्ग)**

दुरध्वनी क्र.०२३६२-२२८८४७/ E-Mail- colldddmo.si-mh@nic.in/collroffice@gmail.com

क्र. जीआव्यप्रा/आदेश/आ.व्य.कायदा/कोरोना/04/2020

दिनांक :-03.04.2020

वाचले - 1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005.

2) मुंबई पोलीस अधिनियम, 1951 चे कलम 43 व कलम 56.

3) भारतीय सथ रोग नियत्रण अधिनियम, 1897 व महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाय योजना नियम 2020.

4) महाराष्ट्र शासन क्रमांक 2020 प्रक्र.58 आरोग्य -5 दिनांक 14/3/2020

5) मा. प्रधान सचीव सार्वजनीक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र कोरोना 2020 प्र.क्र.58 आरोग्य 5 दिनांक 14/3/2020.

6) या कार्यालयाकडील क्र. जीआव्यप्रा/आदेश/आ.व्य.कायदा/कोरोना/03/2020 दिनांक 28.03.2020

7) विशेष महा पोलीस निरीक्षक (का. व सु.) यांचेकडील परिपत्रक क्रमांक पोमसं/24/कोरोना/प्रवास परवाना/100/2020 दिनांक 31/03/2020.

8) क्रमांक गृह.फौज.संहिता/अत्या.सेवा/कावि.84/2020 दिनांक 26/3/2020.

9) क्रमांक गृह.फौज.संहिता/अत्या.सेवा/कावि.85/144/2020 दिनांक 25/3/2020

## अत्यावशक सेवा सुविधा याकरीता परवाने निर्गमित करणेबाबत सुधारीत आदेश.

ज्याअर्थी शासनाने करोना विषाणू (कोव्हिड - 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथ रोग प्रतिबंधक कायदा 1897 दिनांक 13/3/2020 पासुन लागू करून खंड दोन तीन चार मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमीत केलेली आहे. जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात (कोव्हिड - 19) नियंत्रणात आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

**संदर्भ क्रमांक 6 अन्वये तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग / पोलीस निरीक्षक वायरलेस, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय सिंधुदुर्ग यांना सिंधुदुर्ग जिल्हयातून इतर जिल्हयात जाणा-या नागरिकांना परवानगी देण्याचे अधिकार दिलेले होते. सदर अधिकार या आदेशान्वये संपुष्टात आणण्यात येत आहेत.**

**यापुढे अत्यावश्यक सेवा - सुविधा व व तत्सम बाबींसंदर्भात सिंधुदुर्ग जिल्हयात परवाने / पासेस देण्यासंदर्भात संदर्भ क्र.7 नुसार खाली नमुद केलेल्या मुद्यांप्रमाणे कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग यांच्या कार्यालयामार्फत covid19.mhpolice.in या वेबसाईट अंतर्गत करणेची आहे.**

1) एखाद्या नागरिकास सध्या रहिवाशी जिल्हयामध्ये किंवा त्या जिल्हयामधुन दुस-या जिल्हयात प्रवास करणे अत्यावश्यक असेल, तर त्या नागरिकाच्या प्रवासाची कारणमिमांसाची खातरजमा / पडताळणी करून संबंधीत पोलीस उपायुक्त / पोलीस अधीक्षक यांनी त्या नागरिकास प्रवासाची

परवानगी देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

2) तसेच महाराष्ट्र राज्यातील नागरिकास दुस-या राज्यात प्रवास करणे अत्यावश्यक असेल अशा नागरिकांनीच फक्त अत्यावश्यक सेवेसाठी परवानगी मिळण्याकरीता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सविस्तर अर्ज सादर करावा.

**तसेच संदर्भ क्र.8 अन्वये सर्व निवासी नायब तहसिलदार, परिवहन निरीक्षक व सर्व तालुका कृषी अधिकारी यांना अत्यावश्यक / जीवनावश्यक / कृषी विषयक बाबी संदर्भात वस्तुंच्या वाहतुकीसाठी वाहतुक परवाने निर्गमीत करणेसाठी प्रदान केलेले अधिकार या आदेशान्वये संपुष्टात आणण्यात येत आहेत.**

1) अत्यावश्यक / जीवनावश्यक / कृषी विषयक माल वाहतुक करणा-या वाहनांना माल वाहतुक करण्याची परवानगी असून त्यांना स्वतंत्र परवानगी घेण्याची गरज नाही.

तसेच संदर्भ क्र.9 अन्वये सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सर्व सीमा जिल्ह्यात प्रवेशासाठी बंद करण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने मा पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग व त्यांच्या अधिनस्त कार्यरत असलेले उपविभागीय पोलीस अधिकारी, [redacted] पोलीस निरीक्षक यांनी अधिकृत परवाने / पासेस असल्याशिवाय कोणत्याही नागरिकास / वाहनास सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश देता कामा नये किंवा जिल्हा हद्दीच्या बाहेर सोडता कामा नये. यामध्ये हलगर्जीपणा केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

सदरचा आदेश माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक 03/03/2020 रोजी निर्गमीत करण्यात येत आहे.

**(के. मंजूलक्ष्मी)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सिंधुदुर्ग**

प्रतिलिपी - 1) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी सादर.
2) मा.पोलीस महानिरीक्षक, मुंबई यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
3) पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांजकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी.
4) उपविभागीय पोलीस अधिकारी (सर्व) यांजकडे माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.
5) पोलीस निरीक्षक (सर्व) यांजकडे माहिती व कार्यवाहीसाठी रवाना
6) तहसिलदार / गट विकास अधिकारी / तालुका कृषी अधिकारी (सर्व) यांजकडे माहितीसाठी रवाना
7) जिल्हा माहिती अधिकार, सिंधुदुर्ग यांजकडे कार्यवाहीसाठी रवाना.